तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील विविध कार्यालये तथा
संस्थामधील प्रबंधक/सहायक संचालक(अतांत्रिक) इ.पदावरील पदोन्नतीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
*शासन निर्णय क्र.एससीटी-२००७/(१४२/०७)/तांशि-४*
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.
दिनांक:-५/८/२००८

संदर्भ:-१)संचालक,तंत्रशिक्षण यांचे क्र.४/आस्था/वर्ग-२ पदोन्नती/२००७/१४४३,दि.१७/९/२००७ चे पत्र.
२)संचालक,तंत्रशिक्षण यांचे क्र.४/आस्था/२००८/१४९७,दि.१७/७/२००८ चे पत्र.

**शासन निर्णय:-** महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षक व प्रशासकीय सेवा,गट-ब या संवर्गात रु.६५००-२००-१०५०० या वेतनश्रेणीत प्रबंधक/सहायक संचालक(अतां.)/सहायक सचिव(अतां)/नियोजन अधिकारी/रचना व कार्यपध्दती अधिकारी इ. गट-ब या पदावर तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अधिक्षक या पदावरील खालील कर्मचा-यांना तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर स्तंभ-५ मध्ये दर्शविण्यात येत आहे:-

| अ क्र | कर्मचा-याचे नांव व प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग | सद्या कार्यरत असलेले कार्यालयाचे नांव | पदोन्नतीनंतरचे पदनाम व पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३ | ४. | ५. |
| १ | श्रीमती र.रा.अतकरी , इमाव | खुला | अधिक्षक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय,मुंबई | तंत्रशिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई येथे रिक्त असलेल्या सहाय्यक संचालक (अतां) पदावर |
| २ | श्री.ए.ए.पावसकर,इमाव | खुला | अधिक्षक, तंत्रशिक्षण संचालनालय, मु का मुंबई | तंत्रशिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई येथे रिक्त असलेल्या सहाय्यक संचालक (अतां) पदावर |
| ३ | श्रीमती एस.ए.रायकर, खुला | खुला | अधिक्षक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय,मुंबई | तंत्रशिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई येथे रिक्त असलेल्या सहाय्यक संचालक (अतां) पदावर |
| ४ | श्रीमती स्ने.सु.किर्तीकर, खुला | खुला | अधिक्षक, शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे | शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे येथे रिक्त असलेल्या प्रबंधक पदावर |
| ५ | श्री.बी.डब्ल्यु.चव्हाण,अजा | अजा | अधिक्षक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,अमरावती | शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ येथे रिक्त असलेल्या प्रबंधक पदावर |
| ६ | श्री.एस.एम.पवार,भज-ब | खुला | अधिक्षक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक | तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक येथे रिक्त असलेल्या सहाय्यक संचालक (अतां) पदावर |
| ७ | श्रीमती उ.धों.मिस्त्री,इमाव | खुला | अधिक्षक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई | तंत्रशिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई येथे रिक्त असलेल्या सहाय्यक संचालक (अतां) पदावर |
| ८ | श्रीमती अ.प्र.बांदेकर,खुला | खुला | अधिक्षक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई येथे रिक्त असलेल्या सहाय्यक सचिव (अतां) पदावर |
| ९ | श्री.ए.जी.लुडबे, खुला | खुला | अधिक्षक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण | शासकीय तंत्रनिकेतन, पेण येथे रिक्त असलेल्या प्रबंधक पदावर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | मंडळ, मुंबई | |
| १० | श्री.सी.आर.बांबळे,अज | खुला | अधिक्षक, अभि महा पुणे | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड येथे रिक्त असलेल्या प्रबंधक पदावर |
| ११ | श्री व्ही व्ही राखुंडे,इमाव | खुला | अधिक्षक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर | शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतन, यवतमाळ येथे रिक्त असलेल्या प्रबंधक पदावर |
| १२ | श्रीम एल व्ही इंगोले,इमाव | खुला | अधिक्षक, शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर | शासकीय तंत्रनिकेतन, साकोली येथे श्रीमती रंगारी यांच्या दिनांक ३१/७/२००८ रोजी सेवानिवृत्तीमुळे रिक्त असलेल्या प्रबंधक पदावर |
| १३ | श्री एल एन गोहणे,इमाव | खुला | अधिक्षक, शासकीय तंत्रनिकेतन, गडचिरोली | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर येथे रिक्त असलेल्या प्रबंधक पदावर |
| १४ | श्रीम एन के रामटेके, खुला | खुला | अधिक्षक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर | शासकीय तंत्रनिकेतन, ब्रम्हपुरी येथे रिक्त असलेल्या प्रबंधक पदावर |
| १५ | श्रीम सु ग रणदिवे, विजा-अ | विजा-अ | अधिक्षक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे येथे रिक्त असलेल्या सहाय्यक सचिव (अतां) पदावर |
| १६ | श्री के आर निकुंबे, अजा | अजा | अधिक्षक, शासकीय तंत्रनिकेतन, धुळे | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव येथे रिक्त असलेल्या प्रबंधक पदावर |
| १७ | श्री के वाय बल्लाळ, भज-क | भज-क | अधिक्षक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड | शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर येथे रिक्त असलेल्या प्रबंधक पदावर |
| १८ | श्री ए डी भार्गव,विमाप्र | विमाप्र | अधिक्षक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद | शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद येथे रिक्त असलेल्या प्रबंधक पदावर |

३. मा.उच्च न्यायालय,मुंबई येथील याचिका क्र.८४५२/०४ च्या संदर्भात मा.उच्च न्यायालयाने दि.९/३/२००७ रोजी दिलेले आदेश व त्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभाग पत्र क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि.१३/३/२००७ अन्वये दिलेल्या सूचना लक्षात घेता,मूळ याचिका क्र.८४५२/०४ च्या निर्णयाच्या अधीन राहून सदर पदोन्नत्या तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे.

४. उपरोक्त अ.क्र.११ येथील श्री व्ही व्ही राखुंडे यांना सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.२९/९५/बारा,दि.२२/४/१९९६ मधील तरतुदीनुसार त्यांचेविरुध्द प्रलंबित असलेल्या विभागीय चौकशीच्या निर्णयाच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

५. उपरोक्त अधिका-यांच्या तात्पुरत्या पदोन्नतीसाठी तयार करण्यात आलेल्या निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची संमती प्राप्त झाल्यानंतर सदर पदोन्नत्या नियमित करण्यात येतील.

६. पदोन्नतीसाठी निवड झालेल्या वरील अधिका-यांनी ३० दिवसाच्या आत नविन पदावर रुजु व्हावे.सदर विहीत मुदतीत जे अधिकारी पदोन्नतीवरील पदावर रुजु होणार नाहीत अथवा जे अधिकारी पदोन्नतीचे पद स्विकारण्यास नकार दर्शवतील,त्यांचे नांव पदोन्नतीसाठी पात्र असणा-या अधिका-यांच्या निवड यादीतून काढून टाकण्यात येईल. प्रबंधक/सहायक

संचालक(अतां.)/सहायक सचिव(अतां)/नियोजन अधिकारी/रचना व कार्यपध्दती अधिकारी इ. गट-ब पदावरील पदोन्नतीसाठी पात्र असणा-या अधिका-यांची निवड यादी त्यानंतर जेव्हा बनवण्यात येईल,त्यावेळी पदोन्नती नाकारणा-या अधिका-यांच्या प्रकरणाचा गुणवत्तेप्रमाणे पुन्हा विचार केला जाईल.उपरोक्त तात्पुरत्या पदोन्नत्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता अथवा ११ महिन्याचा कालावधी यापैकी जे आगोदर घडेल तोपर्यंत चालू राहतील,त्यानंतर सदर तात्पुरत्या पदोन्नत्या संपुष्टात येतील.

७. प्रस्तुत शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.८५२/१२ व ६९८/१६ब, दि.२०/६/२००८ अन्वये मिळालेल्या मान्यतेअंती निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

(वि.भा.सोनवणे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रति,

संचालक,तंत्रशिक्षण,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी पदोन्नतीसाठी तयार करण्यात आलेल्या निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची संमती प्राप्त न झाल्यास उपरोक्त अधिका-यांच्या तात्पुरत्या पदोन्नत्या ११ महिन्यांच्या कालावधीनंतर समाप्त करण्यात याव्यात.

प्रत:-

- संचालक,तंत्रशिक्षण,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
- संचालक,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई.
- सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,अमरावती,नागपूर,औरंगाबाद,नाशिक.
- संचालक,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई.
- महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर.
- सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग(पत्राव्दारे).
- अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
- निवासी लेखा अधिकारी,मुंबई.
- जिल्हा कोषागार अधिकारी,ठाणे,अमरावती,नागपूर,गडचिरोली,धुळे,कराड,औरंगाबाद,उस्मानाबाद,सोलापूर,जळगांव पुणे.
- सामान्य प्रशासन विभाग,(कार्यासन १२ व १६-ब),मंत्रालय.
- संबधीत अधिकारी व त्यांची कार्यालये(संचालक,तंत्रशिक्षण यांच्यामार्फत.)
- निवड नस्ती(तांशि-४)